## निशाणी क्र.९५ वरील आदेश
(दिनांक ०२.०४.२०२४)

सदरचा अर्ज वादींनी प्रतिवादी क्र.२ विरुध्द झालेला अबेटमेंटचा हुकूम सेट असाईड करुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. त्यांचे असे कथन आहे की, वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचेविरुध्द अतिक्रमण काढुन मिळण्यासाठी व निरंतर मनाईसाठी दाखल केलेला आहे. सदरच्या दाव्याचे कामकाज चालु असतांना या दाव्यातील प्रतिवादी क्र.२ कांताबाई यशवंत भागवत या दि.०४.०४.२०१८ रोजी मयत झालेल्या आहेत. तसा त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी, तसेच झालेला उशीर माफ करुन मिळण्यासाठी वेगळे अर्ज दाखल केलेले आहेत. सदरील प्रतिवादी क्र.२ या महिला असुन त्या वादींच्या घरापासुन काही अंतरावर राहत असुन त्यांना त्याची कल्पना झाली नाही. तसेच सदरील वारस रेकॉर्डवर घेण्याबाबतच्या अज्ञानामुळे सदरील माहिती घेऊन वेळेत वारस रेकॉर्डवर घेणे शक्य झाले नाही. माहिती मिळाल्यानंतर खुप दिवस वारस दाखला उपलब्ध होत नव्हता, त्यामुळे सुध्दा अर्ज दाखल करण्यास उशीर झाल्याने दावा अबेट झालेला आहे.

३. त्यांचे पुढे असे कथन आहे की, सदरील दावा हा स्थावर मिळकतीच्या मालकी हक्काच्या संदर्भात असुन त्यामध्ये सदरील प्रतिवादी हे दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे संबंधीत पक्षकारांचे वारस त्यांचे मृत्युपश्चात रेकॉर्डवर घेणे आवश्यक असते. तसे न झाल्यास सदरील दावा तांत्रिक कारणास्तव फेटाळला जाऊन वादींचा जो मुलभूत कायदेशीर हक्क आहे तो त्यांना मिळणार नाही. म्हणुन वरीलप्रमाणे वादी आपला हक्क मागत असतांना दाव्याची गुणदोषावर सुनावणी होऊन सत्यस्थिती मे. कोर्टापुढे येणार आहे आणि त्यानुसार वादाचे अंतिम निराकरण होणार आहे. त्यामुळे सदरील झालेला अबेटमेंटचा हुकूम सेट असाईड करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

४. प्रतिवादी क्र.३ यांनी नि.५८ अन्वये सदर अर्जास विरोध करुन त्यांचा जबाब दाखल केलेला आहे. त्यांचे असे कथन आहे की, वादींनी दाखल केलेला अबेटमेंट सेट असाईडचा अर्ज पुर्णपणे बेकायदेशीर स्वरुपाचा असुन फेटाळण्यास पात्र आहे. वादी यांनी अबेटमेंट सेट असाईड करुन मिळण्यासाठी केलेल्या अर्जामध्येदेखील कसलेली कायदेशीर कारण नमुद केलेले नाही. त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

५. वादींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी. एस. गवळी व प्रतिवादी क्र.३ तर्फे विद्वान

विधीज्ञ श्री. ए. एस. महाजन यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

**६.** अर्ज व जबाब वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादींनी नि.५६ यादीलगत प्रतिवादी क्र.२ कांताबाई यशवंत भागवत यांचे मृत्युप्रमाणपत्र नि.९९ अन्वये दाखल केलेले आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दि.०४.०४.२०१८ रोजी कांताबाई यशवंत भागवत यांचे निधन झालेले आहे. त्यानंतर ९० दिवसांच्या आत म्हणजेच दि.०३.०७.२०१८ रोजीपावेतो प्रतिवादी क्र.२ चे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक व गरजेचे होते. तसे न झाल्यामुळे दावा अबेट झालेला आहे. वादींचा नि.५१ वरील विलंब माफीचा अर्ज आज रोजी खर्च लादुन मंजुर करण्यात आलेला आहे.

**७.** दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र.२ हे आवश्यक पक्षकार होते. प्रतिवादी क्र.२ मयत झाल्यामुळे त्यांच्या वारसांना रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. अर्जातील कारणांचा विचार करता वादींची विनंती मान्य केल्यास कोणत्याही प्रकारची बाधा राहणार नाही. तसेच मुळ दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. याउलट अर्ज मंजुर केल्यास मुळ दावा गुणदोषावर निकाली काढता येईल. या सर्व कारणास्तव प्रतिवादी क्र.२ विरुध्द झालेला अबेटमेंटचा हुकूम सेट असाईड करुन मिळण्यास पात्र आहे. करिता नि.५१ च्या अर्जावरील आदेशाच्या अनुषंगाने मी खालील आदेश करीत आहेः–

## आदेश

**१.** वादींचा अर्ज नि.क्र.९५ मंजुर करण्यात येतो.

**२.** नि.५१ अर्जावरील आदेशात नमुद खर्चाची रक्कम वादींनी जमा केल्यानंतर प्रतिवादी क्र.२ यांच्याविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश सेट असाईड करण्यात येईल.

JYOTI SHIVAM KHEDKAR GOYAL
Digitally signed by JYOTI SHIVAM KHEDKAR GOYAL
Date: 2024.04.02 18:17:14 +0530

दौंड. [ **श्रीमती जे.एस.खेडकर–गोयल** ]
दि. ०२.०४.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, दौंड, जि. पुणे.

**<u>CERTIFICATE</u>**

I affirm that the contents of this P.D.F. file of Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | :- | P. D. Jagatap. |
| Name of the Court | :- | Smt. J. S. Khedkar-Goyal,<br>Jt. C.J.J.D., Daund, Dist. Pune. |
| Date | :- | 02.04.2024. |
| Order signed by the<br>Presiding Officer on | :- | 02.04.2024. |
| Order uploaded on | :- | 02.04.2024. |